(21)

दिनांक ०१/१२/२०२३

प्रति,

मा.आमदार निलेशजी लंके साहेब,
विधानसभा सदस्य, पारनेर,
ता.पारनेर, जि.अहमदनगर

अर्जदार :- श्री.ज्ञानदेव म्हातारबा सुंबे, वय ५६ वर्षे, धंदा-शेती
रा.मु.पो.पाडळी तर्फे कान्हूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर.
मो.नं.९५७१४३८७९५

विषय :- किमान दोन ठिकाणी तरी आमच्या रानच्या वस्तीवर हायमॅक्स लावणेबाबत.

महोदय,

मी रा.मु.पो.पाडळी तर्फे कान्हूर, ता.पारनेर, जि.अहमदनगर या ठिकाणचा रहिवाशी असून उपरोक्त विषयान्वये विनंतीपूर्वक आपणास निवेदन करतो की, आम्हा गावकऱ्यांना आमच्या वस्तीवर येण्या जाण्यासाठी चांगला असा रस्ता नाही. मी व माझे गावकरी कित्येक दिवसांपासून रस्ताच नसल्यामुळे पाऊल वाटेने ये जा करत असतो व आमच्या पाऊलवाट रस्त्यावर व वस्त्यांवर पुरेशी लाईटची व्यवस्था नाही. आमच्या रानच्या वस्तीवर व इतर वस्तीवर जवळून सिंगलफेज लाईट गेलेली आहे परंतु व्यक्तीगत रोड नसल्याने फक्त पाऊलवाट असल्याने आमच्यावर आतापर्यंत कित्येक वाईट प्रसंग ओढावलेले आहेत. अंधारात काही हिंस्त्र वन्य प्राणी आमच्या शेळया, मेंढया व कोंबडया खातात त्यामुळे आमचे प्रचंड आर्थिक नुकसान होते. आम्हाला गावात रोडलाईटची सुविधा नसल्याने जवळून सिंगलफेज लाईट गेलेली आहे. असेच दि.२४/११/२०२३ रोजी संध्याकाळी माझी एक शेळी बिटयाने आमच्या समक्ष फरपटत पळवून नेली. त्याचा पंचनामा केला आहे व आजुबाजूला बिबटयाचा हा वावर हा नेहमीच असतो. आमच्या वस्त्यामध्ये आमच्या भागात ४०० ते ५०० मीटर अंतरावर ५ ते ६ वस्त्या आहेत. त्या सर्वांना या वन्य हिंस्त्रप्राण्यांपासून जीविताचा धोका आहे. त्यामुळे माझी व माझ्या गावकऱ्यांची अशी विनंती आहे की, रानच्या वस्तीवर किमान दोन ठिकाणी तरी हायमॅक्स लावण्यात यावे.

ही आपणास नम्र विनंती.

दिनांक : ०१/१२/२०२३

आपला विश्वासू,

(श्री.ज्ञानदेव म्हातारबा सुंबे)
आपला कार्यकर्ता

सोबत :- पंचनामा जोडत आहे.

MLA (P) 324

पंचनामा

(1) रामदास देवराम दावभट वय ६०वर्षे
धंदा - शेती

(2) पिराजी तुळशीराम शिनारे
वय - ६३ वर्षे धंदा - शेती

आम्हा इसमास वनपाल भाळवणी व त्यांचे अधिनिस्थ वनकर्मचारी स्टाफ यांनी बोलवल्या वरुन आम्ही खालिल नमुद नामे इसम पंचइसम या नात्याने मौजे पाडळी तर्फे कान्हुर या गावाच्या पुर्व दिशेला हजर असुन आहोत. वन अधिकारी भाळवणी यांनी वनविभाग कार्यालय पारनेर यांच्या कडील दि. २४।११।२०२३ रोजीचा श्री ज्ञानदेव म्हतारबा लुंबे रा. पाडळी तर्फे कान्हुर यांच्या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात पाळीव प्राणी शेळी मृत झाल्याचा प्राप्त अर्ज वाचुन दाखविला. तसा घटनास्थळाचा सत्यपरिस्थितीचा पंचनामा लिहुन देण्यास सांगितल्या वरुन आम्ही पंचइसम घटना स्थळाचे सत्य परिस्थिती चा पंचनामा लिहुन देतो तो पुढील प्रमाणे.

आम्हा पंच इसमास व वनअधिकारी यांना अर्जदार श्री ज्ञानदेव म्हतारबा लुंबे रा पाडळी तर्फे कान्हुर यांनी त्यांच्या मालकीचे मृत अवस्थेत पडलेली शेळी दाखवली, आम्ही समक्ष पणे मृत शेळीची पहाणी केली सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास गट नं ११५ मध्ये शेळ्या चरत असताना अचानक पणे बिबट्याने हल्ला करुन शेळी जागेवरच ठार केली व जवळच असलेल्या नुरीच्या पिकात घेवुन गेला, व पुर्ण शेळी खाल्लेली दिसत आहे सदरचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत झालेली काळ्या रंगाची संकरीत शेळी आम्हा पंचाच्या मते साधारण पणे १५०००ते १६०००। रुपये किंमत आहे सदर प्रकरणी श्री लुंबे यांना शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ती नुकसान भरपाई देण्यास हरकत नाही.

हा घटनास्थळाचा सत्य परस्थितीचा पंचनामा स. १०:०० वाजता सुरु करुन १२:१० वाजता संपविला व पंचनामा वाचुन पाहुन खात्री करुन त्यावर सही/निशाणी केली.

ठिकाण :- पाडळी तर्फे कान्हुर
गा. गट नं ११५

दिनांक :- २४।११।२०२३

(1) रा. दे. दावभट

(2)

वनपाल भाळवणी